# महात्मा गांधीजींचे शिक्षणविषयक विचार व शालेय अभ्यासक्रम

**प्रा.डॉ.मोरे वनिता अरूण**

सहाय्यक प्राध्यापक, महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय,मार्केट यार्ड, कोल्हापूर

**प्रस्तावनाः–**

महात्मा गांधीजी हे एक युगपुरूष होते. ते सत्याला परमेश्वर मानीत असत. अत्यंत साधी राहणी असणाऱ्या माणसाने आपल्या उच्च विचारांनी तसेच अमोघ कर्तृत्वाने व शक्तीने साऱ्या जगास भारावून टाकले. गांधीजींनी अहिंसेला व्यापक असा अर्थ प्राप्त करून दिला. नैतिकता हा त्यांच्या जीवनाचा मूलाधार होता. महात्मा गांधी स्वांतत्र्य लढयात सेनानी होते, अहिंसा धर्माचे प्रवर्तक होते, जीवन शोधक होते, मानवतेचे पुजारी होते, एक श्रेष्ठ तत्वचिंतक आणि शिक्षणतज्ञ होते. या त्यांच्या विविध भूमिका एकाच जीवनविषयक तत्वज्ञानाचे अविष्कार होते.

''बालकाच्या किंवा व्यक्तींच्या शरीर, नस्तिक आणि आत्म्याच्या अंतर्गत सर्वोत्तम गुणांचा विकास शिक्षण होय'' असे गांधीजी म्हणतात.

***गांधीजींचे शिक्षणविषयक विचार :–** गांधीजींच्या जीवनविषयक तत्वज्ञानात आध्यात्मिकतेला प्राधान्य स्थान होते. शिक्षणातही या तत्वज्ञानाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. मानवाचा समतोल सर्वांगीण व सुसंवादी विकास साधण्याच्या दृष्टीने शिक्षणाच्या ध्येये दोन प्रकारात मांडली आहेत.

**१)तात्कालीन ध्येये :–**

**अ. चारित्र्य निर्मिती करणे. :–** चारित्र्य निर्निती म्हणजे विविध गुणांची जोपासना करणे व ते गुण विद्यार्थ्यांत संक्रमित करण्याचा प्रयत्न करणे होय. संयम, सहिष्णुता, सदाचार, आत्मनिर्भरता, सत्याग्रह, धैर्य, स्वावलंबन इ. गुणांचा समावेश होतो.

**ब. सर्वांगीण विकास करणे :–** विद्यार्थ्यांच्या शारिरीक, मानसिक, भावनिक, बौध्दिक तसेच आध्यात्मिक विकास शिक्षणातून साधला पाहिजे. त्यांच्या विविध क्षमता जोपासला पाहिजेत व विकसीत केल्या पाहिजे.

**क. सांस्कृतिक शिक्षण देणे :–** ज्या शिक्षणातून भारतीय संस्कृतीचा अविष्कार होईल असे शिक्षण असे गांधीजींना अभिप्रेत होते.

**ड. अर्थोत्पादनक्षम शिक्षण देणे :–** आपल्या कुटूंबाचे पालनपोषण करण्याची क्षमता शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांत यावयास हवी. त्यासाठी व्यावसायिक शिक्षण देऊन त्यांची अर्थोत्पादन करण्याची क्षमता विद्यार्थ्यींमध्ये निर्माण करावी.

**२)अंतिम ध्येय :–**

**अ. सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे :–** व्यक्ती आणि समान यांची ध्येये एकमेकास पूरक असली पाहिजेत. जे शिक्षण आपण विद्यार्थ्यांना देणार ते सामाजिक वातावरणास पूरक असावे. शिक्षणातून विद्यार्थ्यांत सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाली पाहिजे.

**ब. आध्यात्मिक विकास साधणे.** व्यक्तिच्या जीवनाचे जे अंतिम ध्येय तेच ध्येय शिक्षणातून साध्य व्हावे असे त्यांचे मत होते. गांधीजी हे समन्वयवादीत होते ते केवळ आदर्शाकडे बघून ते चालत नव्हते तर आदर्शाला व्यवहारिकतेची जोड दिलेली होती.

***गांधीजींच्या शैक्षणिक विचारांची कार्यवाही :–** महात्मा गांधीजींनी आपले शिक्षणविषयक विचार इ.स.१९०८ मध्ये 'हिंद– स्वराज्य' या पुस्तकाव्दारे प्रसिध्द केले. पण त्यापुर्वीच १९११ मध्ये टॉलस्टॉय फार्म याठिकाणी शैक्षणिक प्रयोग चालू केले. गांधीजींनी वर्धा शिक्षण, मूलोदयोग शिक्षण, जीवन शिक्षण, बेसिक– बुनियादी शिक्षण किंवा नयी तालीम इ. नावांनी ओळखल्या जाणाऱ्या नव्या शिक्षण पध्दतीचा पुरस्कार केला. ही शिक्षणपध्दती जीवनाभिमुख होती. स्वावलंबन, स्वाभिमान, श्रम, प्रतिष्ठा या त्रिसुत्रीवर आधारित होती. इ.स.१९३७ साली गांधीजींनी एका परिषदेत आपले शिक्षणविषयक विचार मांडले. या परिषदेला विनोबा भावे, काकासाहेब कालेलकर, डॉ.झाकीर हुसेन, दादा धर्माधिकारी, बाळासाहेब खेर इ.हजर होते. या तज्ञ व्यक्तिंनी विचार विनिमय करून त्याआधारे एक शिक्षण योजना तयार केली. तीच ही 'मुलोदयोग शिक्षण योजना' होय.

*** गांधीजींनी सांगितलेल्या अध्ययन– अध्यापन पध्दती**

**अ)कृतिव्दारा शिक्षण :–** अध्ययनात विद्यार्थ्यांच्या विविध कृतींना वाव असावा डशरीळपस ळी रश्रुरू लू वेळपस हे तत्व लक्षात ठेवून डोळे, कान, नाक, हात, पाय या शरीराच्या अवयवांच्या माध्यमाव्दारे बौध्दीक शिक्षणावर भर दिला.

**ब)स्वानुभवातून शिक्षण :–** शिक्षणात स्वानुभव अधिक महत्वाचा मानला आहे. लहान मुल जेवऐ जास्तीत– जास्त अनुभव घेईल. तेवढे त्याचे ज्ञान अधिक व्यापक होईल. अनुभवातून शिकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळावी. अनुभवाचा संस्कार विद्यार्थ्यांचा मनावर चांगला कोरला जातो.

**ड)समवायातून शिक्षण :–** विविध विषयांचे ज्ञान एकसंघपणे दयावे विविध विषय, जीवन आणि शिक्षण यात सनवाय प्रस्थापित करावा अध्ययनात व्याख्यान, चर्चा यांचा वापर गरजेनुसार करावा.

**गांधीजींचे अन्य शिक्षण विषयक विचार**

१. धार्मिक शिक्षण
२. स्त्री शिक्षण
३. पौंढ शिक्षण
४. स्वयंम शिस्त
५. शिक्षक
६. आदर्श समाज

**अभ्यासक्रम**

मातृभाषा | समाजशास्त्र | सामान्यशास्त्र | मुलोद्योगी हस्तकला | अंकगणित | शारीरिक शिक्षण | ललितकला

*** शालेय अभ्यासक्रमांत कामाचा समावेश करण्यासाठी महात्मा गांधी यांनी पुढील मार्गदर्शक सूचना सांगितल्या आहेत.**

१) **सामाजिक परिस्थितीनुसार :–** मुले ज्या परिस्थितीमध्ये राहतात. त्यांच्याशी संबंधित कामाचा समावेश केला पाहिजे. उदा.शेती, नासेमारी, मातीकाम, सुतारकाम, शिवणकाम अशा कामांचा समावेश केला पाहिजे.

२) **वयानुसार :–** मुलांना त्यांच्या वयानुसार काम दयावे. उदा. इयत्ता ७ वी च्या पुढील मुलांना कौशल्यांचा वापर करणाऱ्या कामांचा समावेश करावा.

३) **उपलब्ध साधन– सामुग्रीनुसार :–** आसपासच्या परिसरातून जे साहित्य उपलब्ध होईल त्यानुसार कामाचे स्वरूप ठरवावे.

४) **अभ्यासक्रमा बाहेरील :–** पुस्तकी अभ्यासक्रमात विषय असो अगर नसो त्याचा विचार न करता मुलांना शिक्षण दयावे. उदा. अन्न साठवणूक प्रक्रिया, वजन, उंची, माप घेणे, बागकाम इ. ज्ञान दयावे.

५) **मुलांच्या निवडीस प्राधान्य :–** मुलांना कोणत्या विषयाचे ज्ञान त्यांच्या आवडीने घ्यावयाचे याचे स्वांतत्र्य मुलांना दिले पाहिजे.

६) **व्यावसायिकांचा मदतीने :–** गरज पडल्यास भागातील लोकांच्या मदतीने मुलांना व्यवसायाचे ज्ञान दिले जावे. उदा. मातीकाम, सुतारकाम, दुधसंकलन, विणकाम इ.

७) **शिक्षकांची जबाबदारी :–** शिक्षकांनी केवळ कामाचे निरीक्षण न करता त्यांच्या कामात सहभागी झाले पाहिजे. स्त्री–पुरूष, सर्वधर्म यांना समान वागणूक दयावी.

८) **क्षमतांचा विकासास अनुसरून :–** कामाचा वर्ग ठरवताना या वर्गातून मुलांच्या कोणत्या क्षमतांचा विकास व्हायला हवा ते शिक्षकाला नेमके माहित पाहिजे. त्यांच्या आधारे शिक्षक मुलांचे मूल्यमापन करू शकतील.

*** पाठयक्रमात कामाचा समावेश करण्याची आवश्यकता :–**

१) मुलांच्या सामाजिक आणि सामाजिक वास्तवाला शालेय वातावरणात स्थान मिळते. त्यामुळे शाळेत मिळणारे शिक्षण आणि त्यांची परिस्थिती यांची सांगड घालण्यासाठी आवश्यक आहे.

२) मुलांची निरीक्षक क्षमता कानाच्या स्वरूपाने वाढविण्यासाठी आवश्यक आहे.

३) शालेय अभ्यासक्रमात कामाचा समोवश केल्याने समाजाच्या उत्पादक आणि शिक्षित या दोन वर्गातील अंतर कमी व्हायला मदत होण्यासाठी आवश्यक आहे.

४) मुलांना कामामुळे संज्ञानात्मक, सामाजिक आणि भावनिक अशा विविध क्षमता आत्मसात करण्याची संधी मिळाल्यामुळे मुलांना हात आणि मन याव्दारे शिक्षण प्राप्त होण्यासाठी आवश्यक आहे.

शालेय पाठयक्रमात कामाचा समावेश केल्यामुळे शेती, सुतारकाम, मातीकान, शिवणकाम, विणकाम अशी कामे करताना मुले फक्त त्यांसाठीची कौशल्ये शिकतात असे नाही तर अनेक सामाजिक आणि भावनिक कौशल्य देखील आत्मसात करतात. त्यात परस्परांशी सहकार्य, सहनशिलता, आदर, शिस्त, सर्जनशीलता, प्रभावी संवाद कौशल्ये, सौंदर्यदृष्टी, उद्योजकता, सामाजिक जबाबदारी अशा अनेक कौशल्यांचा समावेश होतो. याचाच विचार करून नवीन शैक्षणिक धोरणामध्ये याला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.